# रम्य ते बालपण

परवाच ताईचा फोन आला की दादाने आपल्याला बोलावले आहे. त्याने आपल्या सर्व भावंडांचे गेट टू गेदर ठेवले आहे. माहेरी जायचे आणि सगळ्यांच्या भेटी होणार या आनंदाने मनाचे फुलपाखरू नाचायला लागले. त्या दिवसाची आतुरतेने वाट पहायला लागले. आम्ही सर्वजण खूप वर्षांनी एकत्र येणार होतो.

त्याच विचारांच्या धुंदीत आमचे सर्वांचे बालपण डोळ्यासमोर तरळू लागले. खूप मोठा वाडा होता आमचा. खूप बिऱ्हाडही होती. पणजी, आजी, आजोबा, आई, बाबा, काका, काकू आत्या आम्ही सारी भावंडं असा भला मोठा परिवार होता. त्यात एकोपा, प्रेम, आदर होता. पाहुण्यांचाही राबता असायचा. वाड्यातही भरपूर सवंगडी होते. आणि सगळीच घर आपलीच आहेत असे सर्वजण केव्हाही कोणाहीकडे जात येत असत.

आमची शाळा सकाळची असे. त्यावेळी घरी आले की हातपाय धुवून जेवण करायचे. मग सगळ्यांना मदत करायची. तो पर्यंत आजोबांची विश्रांती व्हायची. ते आम्हा सर्वांना अभ्यासाला बसवायचे. त्यात आम्हाला काही अडचणी आल्या तर सोप्या पद्धतीने ती अडचण समजावून सांगायचे. त्यांना शिकवायला खूप आवडत असे.

मग आमची खेळायची वेळ व्हायची. आम्ही सर्व बाल-बच्चे मैदानात जमायचो. विटी-दांडू, लगोरी, सोन-साखळी, लपंडाव, हुतूतू, कधी कधी क्रिकेटही खेळायचो. विटी-दांडू खेळताना विटीही लागायचीच कोणाला तरी जोरात. त्यावरून भांडण आणि मोठ्यांचे रागवणे असायचेच. टीम निवडण्यावरूनही भांडण व्हायची. काही वेळा भांडण रडारडी झाली की खेळच बंद व्हायचा आमचा. मग मोठी माणसं मैदानात उतरायची. आमच्यासाठी निरनिराळे खेळ शोधायची. सुट्टीच्या दिवशी दुपारी कॅरम, पत्ते, चौपट असे खेळ रंगायचे. आमच्या आजीला चौपट खेळायला खूप आवडायचा. तिच्या मैत्रिणी खेळायला यायच्या. त्यात आमची लुडबुड चालायची.

आमची आजी खूप आवडायची मला. तिच्या बेडच्या मागे एक लाकडी कपाट होते. ती त्यातून आम्हाला खाऊ काढून द्यायची. आई-बाबा आम्हाला रागवले की आम्ही आजीला नाव सांगायचो त्यांचे. मग आजी त्यांना रागवायची. ती खूप प्रेमळ, खमकी, लीडर होती. वाड्यात कोणाकडेही

कोणाच्यातरी भांडणं झाली की आजीच्या कोर्टात यायची. तिचे सर्वजण ऐकत असत.

संध्याकाळी वाड्यातल्या सर्व नातवंडांना घेऊन आजी शुभं-करोति, पाढे म्हणायला बसवायची. गणपती स्तोत्र, अथर्वशीर्ष, रामरक्षा आम्हाला तिनेच शिकवले.

रात्री सर्वांनी एकत्रच जेवायला बसायचे असा आजीचा नियम होता. जेवताना सगळे मस्त गप्पा मारत जेवायचे. पानात सर्व चवींचे, सर्व प्रकारचे पदार्थ असत. पानात जे वाढलेय ते खायचेच आणि पान स्वच्छ करायचे. काहीही टाकायचे नाही असा दंडक होता. त्यामुळे सर्व पदार्थ खायची, आणि पान स्वच्छ करायची सवय लहानपणापासूनच लागली.

बाबा ऑफीस मधुन आल्यावर आमच्या अभ्यासाची उजळणी होत असे. काका रोज आमच्यासाठी ऑफीस मधुन येताना खाऊ आणत असे. आई विणकाम, आत्या भरतकाम सुंदर करत असे. काकू गाण्यांचे क्लास घेई. आई पचडी, लाडू, आप्पे छान करत असे. आत्याच्या चिरोटे तर काकूंची करंजी खुसखुशीत असायची.

रोज नवा खाऊ खायला मिळायचा. मज्जा असायची. कधी मोठे झालो कळलेच नाही. आता आमची उतरती भाजणी सुरु झाली. आता कुठेही जाताना मुलांच्या काठीचा आधार लागतो. त्यांच्यावर विसंबावे लागते. त्यांच्या सोयी नुसार कार्यक्रम ठरवावा लागतो. आता या संगणकाच्या गर्दीत सगळेच कार्यरत. मोबाईल मध्ये आबाल वृद्ध मग्न. जेवताना बाळाला फोन लागतो. आजोबांना मित्राचा फोन नंबर आठवत नाही. आजीला अंगाई म्हणायला यू ट्यूब शोधावी लागते. यात सर्वांचे संवादच प्रत्यक्षपणे हरवलेत. मोबाईल मधून रोज खोटे खोटे व्हाट्सॲप वर भेटायचे. तरी पण आम्ही आम्हाला मिळालेली ही प्रेमळ शिस्तरूपी संस्कार शिदोरीची गाठोडी सांभाळून ठेवली आहेत आणि ही श्रीमंती नातवंडाकडे सोपवलोय.



सौ. उषा शशिकांत पाठक
९०११०९४१२८